**नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०२३**
**दत्तात्रय –वि– राजेंद्र व इतर**

## अर्ज नि.क्र.३३ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अनुसार दाखल करुन वादग्रस्त रस्त्याचे स्थळ निरीक्षण करण्याकरिता कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे देवून अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शवला आहे. प्रतिवादींचे विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने पुरसीस नि.क्र. ३६ सोबत मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे दाखल केले आहेत.

०३. उभयपक्षांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुत संचिकेचे अवलोकन केले असता नायब तहसीलदार सिंदखेडराजा यांनी रस्ता प्रकरण क्रमांक एम.सी.ए.–५/डोरव्ही/ ५०/२०२०–२१ मध्ये दिनांक ०६.०७.२०२२ रोजी दिलेला निकाल रद्द होवून मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना त्यांची जमीन गटक्रमांक ८४ व ८६ मध्ये जाणे येणे करिता डोरव्ही ते मलकापूर पांग्रा या डांबर रस्त्याने येवून भगवान बाबुराव मुरकट यांचे गटक्रमांक १५६ च्या पूर्वेकडील उत्तर–दक्षिण चालीचा रस्ता अस्तित्वात असून सदर रस्त्याने प्रतिवादी हे त्यांच्या जमिनीत जाण्यासाठी वहिवाट करत आहेत. पुढे वादीचे कथन की, गटक्रमांक १५६ च्या पश्चिमेकडील धु–याने उत्तर–दक्षिण चालीचा वहिवाटी रस्ता प्रतिवादींना कधीही उपलब्ध नव्हता व नाही. परंतू, नायब तहसीलदार सिंदखेडराजा यांच्या कडे खोटया मजकुराचे वहिवाटी रस्त्याचे प्रकरण दाखल करुन मंजूर घेतलेला आहे. वरील वस्तुस्थिती प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारलेली आहे. प्रतिवादींच्या मागणीनुसार नायब तहसीलदार सिंदखेडराजा यांनी गटक्रमांक १५६ च्या पश्चिमेकडील धु–याने उत्तर–दक्षिण चालीचा रस्ता मंजूर केलेला आहे. दाव्यातील वाद विषय हा वादग्रस्त रस्ता असून त्याबाबतची सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे.

प्रतिवादींच्या विधीज्ञांनी वरीलप्रमाणे दाखल केलेल्या न्यायनिवाडयातील निष्कर्षाचे अवलोकन करण्यात आले. निश्चितच मा. न्यायमूर्तींनी नोंदविलेल्या निष्कर्षाबाबत दुमत असण्याचे कारण नाही. परंतू, प्रस्तुत प्रकरणात अद्याप उभयपक्षांचा तोंडी पुरावा नोंदविण्यात आलेला नाही. तसेच वादग्रस्त रस्त्याची खरी परिस्थिती न्यायालयासमोर आणण्याची प्राथमिक जबाबदारी वादी पक्षावर आहे. वादीने वरीलप्रमाणे सुचविलेल्या रस्त्याची वस्तुस्थिती न्यायालयासमोर आणण्याकरिता कोर्ट कमिशनरची नेमणूक करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

०१ प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.३३ मंजूर करण्यात आला.

०२ कोर्ट कमिशनर म्हणून विधीज्ञ श्री एन.पी. जाधव यांची नेमणूक करण्यात येत आहे.

०३ वादींना आदेशित करण्यात येते की, त्यांनी कोर्ट कमिशनर फी रुपये ३०००/– पुढील तारखेपर्यंत न्यायालयात जमा करावे किंवा कोर्ट कमिशनर यांना हाती देवून पोहोच घ्यावी.

०४. कोर्ट कमिशनर यांना आदेशित करण्यात येते की, अर्ज नि.क्र.३३ मधील मजकुरानुसार मोका पाहणी उभयपक्षांसमक्ष करुन वादग्रस्त रस्त्या संदर्भात तसा स्थळ निरीक्षण अहवाल नकाशासह व फोटोसह आजपासून दोन आठवडयात न्यायालयात सादर करावा.

SHAIKH ABDULKARIM A
Digitally signed by SHAIKH ABDULKARIM A
Date: 2023.11.02 12:30:21 +0530

(अ.अ.शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
मेहकर

दिनांकः ०१.११.२०२३

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 01.11.2023
Date of Uploading : 02.11.2023